"50 Years onward march from region to global vision."

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४८ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

बुधवार, दि. २५ जानेवारी, २०१२



## मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

## यांनी सादर केलेला अहवाल

"50 Years onward march from region to global vision."

# ४८ वा दीक्षान्त समारंभ

## प्रा. (डॉ.) ना. ज. पवार,

कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
यांनी सादर केलेला अहवाल

आज संपन्न होत असलेल्या विद्यापीठाच्या ४८ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे अर्थ कमिशनचे चेअरमन व भारत सरकारच्या पृथ्वीविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. शैलेश नायक, उपस्थित मान्यवर, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषदेचे व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो,

सुरवातीलाच ४८ व्या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त केलेल्या सर्व स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देतो.

मला सांगण्यास आनंद वाटतो की, शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वसा व वारसा जपणारे विद्यापीठ आहे. या विद्यापीठाच्या जडणघडणीत कै. मा. यशवंतरावजी चव्हाण व लोकनेते बॅ. बाळासाहेब देसाई आणि तत्कालीन काळातील अन्य सर्व मान्यवर यांचे मोलाचे योगदान लाभलेले आहे.

या विद्यापीठाने नुकतेच सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये पदार्पण केले असून सुवर्ण महोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ मोठ्या थाटात साजरा झाला आहे. त्या निमित्ताने कोल्हापूर, सातारा, सांगली व सोलापूर या जिल्ह्यामधून ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. सुवर्ण महोत्सव उद्‌घाटन सोहळ्यास अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण, प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार, आणि विशेष अतिथी म्हणून कोल्हापूरचे पालकमंत्री मा. ना. श्री. हर्षवर्धन पाटील, वनमंत्री मा. ना. श्री. पतंगराव कदम, कामगार मंत्री

मा. ना. श्री. हसन मुश्रीफ, ग्रामीण विकासमंत्री मा.ना.श्री जयंत पाटील, उच्च व तंत्रज्ञान शिक्षण राज्यमंत्री मा. ना. श्री. डी. पी.सावंत, गृहराज्यमंत्री मा. ना. श्री. सतेज पाटील, विद्यापीठाच्या तिन्ही जिल्ह्यातील मा. आमदार व खासदार, श्रीमंत छ. शाहू महाराज, विविध विद्यापीठांचे आजी–माजी आणि या विद्यापीठाचे माजी कुलगुरु, प्रकुलगुरु, विविध अधिकार मंडळाचे सन्माननीय सदस्य, अधिविभाग प्रमुख, महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, विद्यार्थी, विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी आणि सर्व प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा आणि सांगली या तीन जिल्ह्यामध्ये विस्तारलेले आहे. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या २७१ वर गेली आहे. विद्यापीठाशी निगडीत १३ मान्यता प्राप्त संशोधन संस्था आणि पदव्युत्तर शिक्षण देणारे व सपोर्ट सर्व्हिसेस पुरविणारे ३८ अधिविभाग कार्यरत आहेत. या महाविद्यालयांतून आणि अधिविभागातून ८ विविध विद्याशाखातून पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन स्तरावरील सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने महाराष्ट्र शासनाने विद्यापीठास सुमारे ७० कोटींचा भरघोस निधी देण्याचे जाहीर केले आहे. या निधीतून विद्यापीठ नव्याने School of Nano Science and Technology, Yashwantrao Chavan School of Rural Development, Chh. Rajarshi Shahu Research Centre and Museum Complex, School of Physical Education and Sports Complex, Youth Development Centre हे विभाग व Faculty House, Convention Centre इ. ची निर्मिती करणार आहे त्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत. त्याचबरोबर कै. यशवंतरावजी चव्हाण, कै. बाळासाहेब देसाई, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, आण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर आणि पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनांची निर्मिती करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विविध अधिविभागांनी संशोधन आणि इतर कार्यासाठी विविध शिखर संस्थांकडून प्राप्त केलेला निधी लक्षवेधक असून त्या त्या विभागांनी केलेल्या कामाची ती पोचपावतीच होय. या निधी विषयी थोडक्यात सांगावयाचे झाल्यास डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली या संस्थेने विद्यापीठास "Promotion of Research and Scientific Excellence"(PURSE) अंतर्गत ९ कोटी रूपयांचे, जैवतंत्रज्ञान विभागास डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नोलॉजी, नवी दिल्लीकडून Interdisciplinary Programme of Life Sciences या प्रकल्पासाठी ५ कोटी तसेच DST-FIST अंतर्गत भौतिकशास्त्र अधिविगास २ कोटी ६० लाख, रसायनशास्त्र अधिविभागास १ कोटी ७० लाख, वनस्पती अधिविभागास ५० लाख, प्राणीशास्त्र अधिविभागा २५ लाख तर भूगोल अधिविभागास ४० लाख असे २५ कोटी ३५ लाख रुपयांचे संशोधनासाठी भरीव अनुदान प्राप्त केले आहे. या अनुदानातून

प्रयोगशाळाचे आधुनिकीकरण, लायब्ररी व नेटवर्किंगचे काम हाती घेतले आहे. तसेच रुपये ८००० प्रतिमासी अशा ४३ संशोधन शिष्यवृत्ती संशोधक विद्यार्थ्यांसाठी निर्माण केल्या आहेत. पदव्युत्तर शिक्षकांना लॅपटॉप देवू केलेले आहेत. यावर्षी डॉ. श्रीमती जे. पी. जाधव, बायोकेमिस्ट्री अधिविभाग यांना बायोटेक्नॉलॉजी सोसायटी, इंडिया यांनी यंग वुईमेन सायंटिस्ट पारितोषक प्रदान केलेले आहे. तसेच हिंदी विभागातील डॉ. पद्मा पाटील यांना मानव संसाधन विकास मंत्रालय यांचेकडून देण्यात येणारा हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार व भारतीय विद्या संस्थान, त्रिनिदाद यांचे कडून त्रिनिदाद हिंदी आंतरराष्ट्रीय शिखर पुरस्कार व आजरा महाविद्यालयातील डॉ. बाचूळकर यांना राष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचा दर्जा हा कायमच चांगला राहीला आहे. विद्यापीठ अधिविभागातील संशोधनाचा दर्जा उत्तरोत्तर वाढतो आहेच. त्याबरोबरीनेच महाविद्यालयीन स्तरावरुन सुद्धा उत्तम संशोधन झाले पाहिजे त्यादृष्टीने महाविद्यालयीन शिक्षकांना संशोधन प्रकल्प तयार करणे, सादर करणे, संशोधनपर लेखन करणे याबाबत मी स्वत: तज्ज्ञांच्या सहाय्याने सुमारे ७५ ते ८० महाविद्यालयांना मार्गदर्शन केले आहे. त्याचा योग्य तो परिणामही दिसून आला आहे.

अलीकडे देशपातळीवर आणि जागतिक स्तरावर विद्यापीठाचे जे मूल्यांकन होते त्यामध्ये संशोधन हा एक महत्वाचा घटक असतो आणि विद्यापीठाने याबाबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी मजल मारलेली आहे. नुकतेच प्रसिध्द झालेले युनिर्व्हसिटी रॅकींग बाय ॲकॅडेमिक परफॉरमन्स या समूहाने यूआरएपी तंत्रज्ञानावर आधारित जगातील २५०० शिक्षणसंस्थांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये आपले विद्यापीठ १३१८ व्या क्रमांकावर आहे आणि देशपातळीवर आपल्या विद्यापीठाचा या क्रमवारीत २५ व्या तर राज्य पातळीवर दुसरा क्रमांकावर आहे.

विद्यापीठ अधिविभागातील काही प्राध्यापकांनी कोरिया, थायलंड, ऑस्ट्रेलिया येथील विद्यापीठांना अभ्यागत प्राध्यापक व संशोधक म्हणून भेटी दिल्या आहेत. तसेच साबरागामुवा विद्यापीठाशी केलेला सामंजस्य करार पुढील पाच वर्षासाठी वाढविण्यात आला आहे. इन्स्टिटयूट ऑफ इंडियन नॉलेज, त्रिनीदाद व टोबॅगो, वेस्ट इंडिज व शिवाजी विद्यापीठ हिंदी विभाग यांचा भाषा प्रचार विषयी सामंजस्य करार करण्यात आला आहे. INFLIBNET, Ahmedabad व नॅशनल मिशन ऑफ मॅन्युस्क्रिप्टस, नवी दिल्ली यांच्याशीही विद्यापीठाने सामंजस्य करार केलेले आहेत. तसेच आय.सी.यु.आय. ने विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्याबाबतची तयारी कळविली आहे.

विद्यापीठाने या वर्षात काही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या त्यामध्ये पदार्थ विज्ञान विभाग, रसायनशास्त्र विभाग आणि भूगोल अधिविभागाचा समावेश आहे. तसेच विद्यापीठात दि. १३ ते १५ जानेवारी, २०१२ या कालावधीत राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेचे अत्यंत नेटके आयोजन

करण्यात आले होते. त्यामध्ये १७ विद्यापीठातील ३९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठातील एकूण ४ विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. विद्यापीठामध्ये जवळ जवळ २९ विविध प्रकारच्या व्याख्यानमाला सुरु आहेत. त्या माध्यमातून वर्षभरात अनेक मान्यवरांची, विचारवंतांची प्रबोधनपर व्याख्याने झाली आहेत.

विद्यापीठाच्या परिसरात सुरु असलेले अधिविभाग हे जसे विद्यापीठाचे बलस्थान आहेत तशीच विद्यापीठाची संलग्नित महाविद्यालयेसुध्दा उत्तम कामगिरी बजावीत असून विद्यापीठाचा दर्जा उंचावत आहेत आणि या निमित्ताने मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, या संलग्नित महाविद्यालयातील विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, राजाराम कॉलेज, कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन, कोल्हापूर, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, धनंजय गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा, वाय. सी. इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा, एस.जी.एम.कॉलेज, कराड, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड व छत्रपती शाहू इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस अ‍ॅण्ड रिसर्च, कोल्हापूर यां महाविद्यालयांना नॅकचे 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे.

आपल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवायोजनेचे काम हे अत्यंत वैशिष्टयपूर्ण आणि प्रभावीपणे राबविले जाते, यामध्ये चिरंतन विकासाची कामे प्राध्यान्याने केली जातात. विशेष करुन महाराष्ट्र शासनाच्या निर्मलग्राम योजनेचे आपल्या विद्यापीठाने केलेले काम हे राज्यपातळीवर कौतुकास पात्र ठरले आहे. आपल्या विद्यापीठाशी संलग्नित विवेकानंद महाविद्यालयाच्या विशाल सोलापुरे यास 'इंदिरा गांधी अ‍ॅवॉर्ड' मिळालेले आहे. आव्हान चॅन्सेलर्स ब्रिगेड अंतर्गत डिझास्टर मॅनेजमेंट ट्रेनिंग प्रोग्रॅम या अंतर्गत बेस्ट कॉटिजंट ट्रॉफी विद्यापीठास मिळाली आहे. त्याबरोबरच बेस्ट कॉटिजंट लीडर हे अ‍ॅवॉर्ड प्रा. कल्पना पाटील, मोहनराव पतंगराव पाटील कॉलेज, बोरगांव यांना मिळाले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने व महाराष्ट्र शासनाने अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना एमपीएससी, युपीएससी या सेवामध्ये संधी मिळण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी केंद्र दिले आहे. त्याचा अनेक विद्यार्थ्यांना फायदा झालेला आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क या योजनंतर्गत जवळजवळ ७० संलग्नित महाविद्यालये नॅशनल नॉलेज नेटवर्क मध्ये बीएसएनएल च्या ब्रॉडबॅण्ड व्दारा जोडली गेली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आणि शासनाच्या धोरणानुसार विद्यापीठामध्ये सत्रपध्दती लागू करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या अधिविभागामध्ये श्रेणी पध्दती 'क्रेडीट सिस्टीम' सुरु करण्यात आली आहे. या अधिविभागांना शैक्षणिक स्वायत्तत्ता देण्यात आलेली आहे.

विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय हे दक्षिण महाराष्ट्रातील एक सर्वात मोठे सुसज्ज ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात अडीच लाखाहून जास्त ग्रंथ तसेच शेकडो नियतकालिके उपलब्ध आहेत.

विशेष महत्वाची बाब म्हणजे सुमारे ५५०० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ई–जर्नल्स विद्यार्थी व शिक्षक यांना संशोधनासाठी उपलब्ध करुन दिलेली आहेत.

विद्यापीठाच्या उदयाच्यावेळी या माळावर भौतिक सुविधा फारच कमी होत्या, परंतु आता अभिमानाने सांगावेसे वाटते की, जवळजवळ सर्व अधिविभागाना स्वतःच्या सुसज्ज इमारती आहेत. विज्ञान शाखेकडील अधिविभागांकडे उत्तम दर्जाच्या प्रयोगशाळा आहेत. विद्यापीठ परिसरात सर्व सोयीनीयुक्त अशी ५ सभागृहे उपलब्ध आहेत. शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. सर्व अधिविभागासाठी म्हणून युसिक आणि सीएफसी मार्फत आवश्यक त्या सेवा पुरविल्या जातात.

मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, आपले विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत आता जवळ जवळ स्वयंपूर्ण झालेले आहे. विद्यापीठ परिसरात तीन तलाव बांधण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर 'पाणी अडवा पाणी जिरवा' या योजनेचाही अवलंब केलेला आहे. मला वाटते की, याबाबतीत महाराष्ट्रामध्ये आपण आघाडीवर आहोत. याचबरोबर कॅम्पसवर ऊर्जेचा प्रश्न सोडविण्यासाठी पवनऊर्जा व सौरऊर्जा यांचा हायब्रीड इनर्जी प्रकल्प लवकरच उभा करण्यात येत आहे.

या विद्यापीठाचे प्रशासन हे विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच राज्यामध्ये नावाजले जाते. अलीकडे या विद्यापीठाने तयार केलेला 'अकौंटस् कोड' हा राज्य शासनाने मॉडेल कोड म्हणून स्वीकारुन अन्य विद्यापीठाने सुध्दा तो लागू करावा असे आदेश दिलेले आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला मा. कुलपती महोदयानी सतत वेळेत निकाल जाहीर केल्याबददल विद्यापीठाची प्रशंसा केलेली आहे. तसेच राज्यशासनाने अन्य विद्यापीठांना याबाबतीत शिवाजी विद्यापीठाचे मार्गदर्शन घ्यावे असे परिपत्रक काढून सूचविले आहे. विद्यापीठाच्या संलग्नता विभागाने नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्याची पध्दत अत्यंत वस्तुनिष्ठ पध्दतीने तयार केलेली आहे. त्याचेही कौतुक राज्य शासनाने केलेले आहे. यावर्षी सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने विविध ग्रंथ, सर्व पदवीदान समारंभाच्या प्रमुख भाषणांचे एकत्रित प्रकाशन तसेच विद्यापीठाच्या सर्व प्रकाशनाचे उत्कृष्ट प्रतीचे छपाईचे कामकाज विद्यापीठाच्या सुसज्ज मुद्रणालय विभागात केले जाते.

विद्यापीठाच्या प्रशासनात मोठी सक्षमता आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामध्ये अधिक गतिमानता आणण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. यावर्षी १०६ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आल्या आहेत की जे आपल्या कार्यक्षमतेच्या पलिकडे जावून विद्यापीठ प्रशासनाची परंपरा जोपासत आहेत. सर्वसामान्य व मध्यमवर्गातील पालकांच्या पाल्यांना दर्जेदार इंजिनिअरींग शिक्षण मिळाले पाहिजे या हेतुने विद्यापीठाने बी.टेक./एम.टेक. विभाग सुरु केला आहे. या विभागाचे सक्षमीकरण

म्हणून विभागाकडील शिक्षकांच्या जागा नुकत्याच भरल्या आहेत. याविभागातील विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था होण्यासाठी विद्यार्थी–विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र अशी सुसज्ज होस्टेलस् बांधली आहेत. विद्यापीठ वर्धापनदिनी दिवशी राज्यस्तरीय शिक्षक, पदव्युत्तर अधिविभाग, गुणवंत शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी व परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या पाल्यांना गौरविण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाने 'कमवा व शिका' तसेच 'गरजेनुसार काम' यासारख्या देशात वैशिष्ट्यपूर्ण ठरतील अशा काही योजना व उपक्रम चालू केले आहेत. या दोन्ही योजना आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गातून येणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करतात. या विद्यापीठाने स्वत:ची एक गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरु केली आहे. समाजाच्या विविध आर्थिक स्तरातील गुणवंत विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. दरवर्षी सुमारे २५ ते ३० लाख रुपयांच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. या प्रकारच्या योजना राबविणारे आपले विद्यापीठ कदाचित देशात एकमेव असावे. विशेष महत्वाची बाब म्हणजे विद्यापीठाने यावर्षी विद्यापीठाच्या तीन जिल्ह्यातील दुर्गम, डोंगराळ आणि दुष्काळी भागातील महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना सुमारे ५०० सायकली मोफत वितरीत केल्या.

यु. जी. सी. कडून प्लेसमेंट सेलसाठी अनुदान प्राप्त झाले आहे. Differently Abled Persons यांच्यासाठी २८ लाख १० हजार, प्लेसमेंट ॲन्ड करियर गायडन्ससाठी २३ लाख अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या वतीने १ एप्रिल ते २६ डिसेंबर, २०११ अखेर कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या त्यामध्ये टाटा कन्सल्टन्सी–मुंबई, सिंजेटा–गोवा, कोरस इंडिया लि.–मुंबई, सिप्ला, लुपीन इ. नावाजलेल्या कंपन्यांचा समावेश आहे. यावर्षी जवळजवळ ६०० विद्यार्थ्यांना उत्तम नोकऱ्या मिळाल्या आहेत. या विभागाअंतर्गत अनेक कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या बरोबरीने प्रत्येक विभागाचेही आपले स्वतंत्र प्लेसमेंट सेल कार्यरत आहेत. विद्यापीठामध्ये शिक्षक, प्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेसाठी कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या. उद्योगलक्ष्मी आंतरराष्ट्रीय विपणन व्यवसाय परिषदेचे आयोजन केले गेले. तसेच ज्ञानज्योत रॅली व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन पूर्व निवड शिबिराचे आयोजन केले आहे.

खेळाच्या क्षेत्रातही शिवाजी विद्यापीठाने विशेष प्रगती केली आहे. आमचे विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर उत्तम कामगिरी बजावित आहेत. काही मोजकीच नावे घ्यायची तर शैलजा साळोखे, तेजस्विनी सावंत, राही सरनोबत, वीरधवल खाडे, स्नेहांकिता वरुटे, राधिका बराले, वंदना शानभाग, विनोद चौगुले, राम सारंग, नंदा जाधव आणि इतर खेळाडूंनी आपल्या विद्यापीठाचे नाव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे. नुकत्याच चायना येथे झालेल्या इंटर ॲथेलेटिक्स चॅम्पीयन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या दिपक कुंभार व जयश्री शेरगी या खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला

होता. विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाकडून अंशत: अनुदान आणि विद्यापीठ निधीतुन सुमारे ५ कोटी रुपयांचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटीक ट्रॅक बनविण्याचे काम प्रगती पथावर आहे.

संशोधन आणि खेळाच्या क्षेत्रांबरोबरच विद्यापीठाने साहित्य आणि ललित कलेच्या क्षेत्रामध्येही मोलाची कामगिरी केली आहे. कोल्हापूरचा समृध्द कला वारसा मजबूत करण्यासाठी विद्यापीठाने अद्यावत, आंतराष्ट्रीय दर्जाचा स्टूडिओ निर्माण केला आहे. विद्यापीठाने अनेक नामवंत लेखक, गायक, वादक आणि कलाकार निर्माण केले आहेत.

याबरोबरच विद्यापीठामध्ये छ. शाहू महाराज कालीन लोकजीवनाचा परिचय करुन देणारे लेख आणि वस्तू यांचा संग्रह आहे. नियमित शिक्षणापासून अंतरावर असलेल्या परंतु शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या विभागाकडील नोकर भरती लवकरच पूर्ण होत आहे, तसेच वर्ग–१ व वर्ग–२ ची भरती प्रक्रिया सुरु असून ती लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. लोकविकास केंद्र तसेच मध्यवर्ती शास्त्रीय उपकरण केंद्र हे विभाग राष्ट्रीय स्तरावरती नावारुपास आलेले आहेत.

विद्यापीठाने विकासात्मक आणि संशोधनपर अनेक प्रस्ताव मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस, ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट, युजीसी, डीएसटी, डीबीटी, सांस्कृतिक कामकाज मंत्रालय आणि भारतीय खेळ अधिकार मंडळ यांना सादर केले आहेत.

विद्यापीठाने नवीन डाटा सेंटर सुरु करण्याचे ठरविले असून त्याचे काम प्रगती पथावर आहे. त्याचप्रमाणे आयसीटी सोईनीयुक्त भाषा प्रयोगशाळा व सर्व सोईनीयुक्त Smart Classroom उपलब्ध करुन त्याचे काम सुरु आहे.

विद्यापीठ या भागातील शेतकऱ्यांसाठी शेती विषयक सेवा उदा. रेशीमशास्त्र, फलोद्यान, फुलोद्यान, कंपोस्ट याविषयी माहिती देत आहेत. विद्यापीठाच्या या प्रगतीला संख्यात्मक आणि गुणात्मक दर्जा आहे आणि त्याचबरोबर सामाजिक चेहराही आहे. या सर्वांचे श्रेय विद्यापीठातील सर्व संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी यांचे आहे.

आजच्या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. शैलेश नायक यांचे स्वागत करताना मला मनस्वी आनंद होत आहे. त्यांचा थोडक्यात परिचय करुन देणे माझे कर्तव्य ठरते.

डॉ. शैलेश नायक उत्तम दर्जाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन कार्य केलेले एक ख्यातनाम संशोधक आहेत. सध्या ते भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान केंद्रालयाचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. Climate Change, Weather Services, Polar Science, Ocean Modeling अशा कार्याला त्यांनी

उत्तम दिशा देऊन त्यांचे कार्य सुरु आहे. एम. एस. युनिर्व्हसिटी, बडोदा येथून संशोधनाची पदवी घेतल्यानंतर इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले आहे. Marine & Weather Resources या विभागाचे ते संचालक होते. सागरी संशोधनासाठी निगडीत संस्थेचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्सुनामी आणि वादळे यांच्या पूर्व सुचना मिळण्यासाठी त्यांनी उत्तम प्रयोगशाळा उभारण्याचे कार्य केले आहे. National Instiute of Oceanography, Goa या संस्थेच्या सल्लागार समितीचे ते चेअरमन होते. बिरबल साहनी इन्स्टिट्यूट, लखनौ या इन्स्टिट्यूटच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सच्या चेअरमनपदी काम पाहत आहेत. विज्ञान क्षेत्रातील विक्रम साराभाई मेमोरिअल अॅवॉर्ड या पारितोषिकाने त्यांना गौरविण्यात आले आहे. आंध्र विद्यापीठाने D. Sc. ही मानद पदवी त्यांना बहाल केली आहे. या बरोबरच अनेक राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. अनेक संशोधक विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करीत आहेत. सागरी संशोधन, सागर विज्ञान, पृथ्वी विज्ञान, हवामान अशा क्षेत्राशी निगडीत अनेक राष्ट्रीय स्तरावर त्यांनी महत्वाच्या पदांवर काम पाहिले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे ८० संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत. असे एक नावाजलेले शास्त्रज्ञ आणि देशबांधवांसाठी अत्यंत उपयुक्त अशी कामगिरी करणाऱ्या संस्थांमध्ये ते उत्तम कामगिरी बजावत आहेत. त्यांचे याप्रसंगी मी स्वागत करतो.

यापुढे विद्यापीठाची वाटचाल गुणवत्तेच्या दिशेने आपल्याला करावयाची आहे आणि हे विद्यापीठ देशातील एक अग्रगण्य विद्यापीठ ठरावे असा माझा संकल्प आहे. यासाठी आपण सर्व मान्यवर आपआपल्या परीने सहकार्य कराल अशी अपेक्षा करुन माझे अहवाल वाचन पूर्ण करतो व आजच्या पदवी प्रदान समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. शैलेश नायक यांना विनंती करतो की, त्यांनी आपले दीक्षान्त भाषण करावे.

**जयहिंद ! जय महाराष्ट्र !!**

□□□

प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४

.................................................................................

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४